महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१६

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मुंबई विद्यापीठामध्ये प्राध्यापक पद भरती नियमबाह्य पध्दतीने करण्यात आल्याबाबत

(१) ८१२३ (०९-०४-२०१५). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अजय चौधरी (शिवडी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या सन २०११ मध्ये प्रसिध्द झालेल्या जाहिरातीनुसार माहे एप्रिल, २०१३ मध्ये झालेल्या प्राध्यापक पद भरती नियमबाह्य पध्दतीने झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदरील विद्यापीठाने मागील दीड वर्षापूर्वी मराठी विभागांकरीता तीन तासात १०० प्राध्यापकांच्या मुलाखती घेतल्या असून या भरती प्रक्रियेत डावलण्यात येणाऱ्या नागपूरमधील डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी ९ महिने माहितीच्या अधिकाराव्दारे पाठपुरावा करुन सदर भरतीमध्ये प्राध्यापकांची निवड ही नियमबाह्य झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने भरती प्रक्रियेत दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१८-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२) नाही, प्राध्यपकांची भरती ही निवड समितीच्या शिफारशीप्रमाणे झालेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय शिक्षण योजनेंतर्गत राज्यातील शाळांमध्ये कॉम्प्युटरचे प्रमाण केवळ ५२ टक्केच झाल्याबाबत

(२) ८१३३ (०९-०४-२०१५). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या राष्ट्रीय शिक्षण योजनेंतर्गत प्रकाशित झालेल्या सन २०१३-१४ च्या अहवालामध्ये राज्याच्या शाळांमध्ये कॉम्प्युटरचे प्रमाण केवळ ५२ टक्केच असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शाळांचे वेतनेत्तर अनुदान बंद झाल्याने कॉम्प्युटरचे प्रमाणात घट झाल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील शाळांमध्ये कॉम्प्युटरचे प्रमाण १०० टक्के करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२३-०२-२०१६) :(१), (२) व (३) केंद्र पुरस्कृत आयसीटी योजनेंतर्गत सन २०१३-१४ पर्यंत तीन टप्प्यात मिळून ८००० शाळांत संगणक पुरविण्यास मंजूरी देण्यात आली असून सन २०१५-१६ मध्ये केंद्र शासनाने चौथ्या टप्प्यातील १००० शाळांना मंजूरी दिलेली आहे.

शाळांना देण्यात येणाऱ्या वेतनेतर अनुदान व इमारत भाडे/देखभाल अनुदानातून संगणक खरेदीची तरतूद नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पेल्हार (ता.वसई, जि.पालघर) येथे जिल्हा परिषदेच्या प्राथामिक शाळेमधील विद्यार्थी प्राथमिक सुविधापासून वंचित असल्याबाबत.

(३) ९४८९ (०९-०४-२०१५). श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील नालासोपारा पूर्वेकडील वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीत पेल्हार येथे जिल्हा परिषदेच्या प्राथामिक शाळेमधील विद्यार्थी अद्यापही प्राथमिक सुविधापासून वंचित असून त्यांना अशुध्द पाणी प्यावे लागत आहे तसेच तेथील विद्यार्थ्यांना शालेय युनिफॉर्म व बुटसुध्दा देण्यात आलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शाळेत प्राथमिक सुविधा नसल्यामुळे तेथे शिक्षण घेणा-या सुमारे २५० हून अधिक विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय युनिफॉर्म, बूट तसेच मूलभूत सुविधा, शुध्द पाणी न पुरविण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. विनोद तावडे (०१-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) वसई विरार शहर नगरपालिकेच्या हद्दीत पेल्हार जिल्हा परिषदेच्या तीन शाळा असून त्यामध्ये ३४० विद्यार्थी आहेत, या शाळांना विद्यार्थ्यांच्या गणवेश वाटपासाठी रक्कम अदा केली असून विद्यार्थ्यांना गणवेश वाटप केले आहे. तसेच बूट वाटप व वसई विरार नगरपालिकेने पुरविलेले विविध शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले आहे.
(३) शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय युनिफॉर्म, बूट तसेच मुलभूत सुविधा, शुध्द पाणी पुरविण्यात आले आहे.
(४) होय.
(५) विद्यार्थ्यांना विविध सुविधाचा लाभ दिला असून त्याबाबत वाटप रजिस्टरमध्ये विविध वाटपाबाबत नोंदी करण्यात आल्या आहेत.

शिवाजीनगर मानुखुर्द अंतर्गत उच्च शिक्षणाच्या सोयी सुविधांनी युक्त शासकीय महाविद्यालये स्थापन करण्याबाबत

(४) १०२३२ (०९-०४-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवाजीनगर मानुखुर्द (बृहन्मुंबई महानगर पालिका एम पूर्व प्रभाग) अंतर्गत उच्च शिक्षणाच्या सोयी सुविधांनी युक्त शासकीय महाविद्यालये स्थापन करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी, सेवाभावी, संगठना, त्यांचे पदाधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री मा. उच्च शिक्षण मंत्री व उच्च शिक्षण राज्यमंत्री, प्रधान सचिव, उच्च शिक्षण, संबंधित शिक्षण संचालक उच्च शिक्षण यांच्याकडे माहे डिसेंबर २०१४ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेतला व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०३-०३-२०१६) :(१) नाही.
(२) व (३) विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ८२ व ८३ यान्वये नवीन महाविद्यालय/अभ्यासक्रम/विद्याशाखा इत्यादींना मान्यता देण्याची कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे, त्यानुसार विद्यापीठाकडून अशा स्वरुपाचा कोणताही प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही. तसेच शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी नविन महाविद्यालयांना मान्यता न देण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आलेला आहे. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

मराठवाड्यासह राज्यातील दुष्काळग्रस्त, अवर्षण, अवकाळी, पाऊस, गारपीटग्रस्त जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पाल्यांचे (विद्यार्थी) शैक्षणिक व परिक्षा शुल्क माफ करण्याबाबतची केलेली मागणी

(५) १०४९५ (०९-०४-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यासह राज्यातील दुष्काळग्रस्त, अवर्षण, अवकाळी पाऊस, गारपीटग्रस्त जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे पाल्य (विद्यार्थी) यांचे शैक्षणिक व परिक्षा शुल्क माफ करण्याबाबत दिनांक १४ डिसेंबर, २०१४ रोजी शासनाकडे अचलपूरच्या लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२५-०२-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) महसूल व वन विभागाने दिनांक २० ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील पिकांची हंगामी पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असलेल्या १४,७०८ गावांमध्ये दुष्काळसदृष्य परिस्थिती जाहीर केली असून, महसूल व वन विभागाच्या सदर शासन निर्णयाच्या अनुषंगानू उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्तयाखालील महाविद्यालयांमध्ये उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना सदर सवलतीचा लाभ मिळण्यासाठी दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

तथापि, महसूल व वन विभागाने, दिनांक ९ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या शुध्दीपत्रकान्वये, सन २०१५-१६ च्या खरीप हंगामातील पिक कापणी प्रयोगानंतर ५० पैशांपेकी कमी पैसेवारी आलेल्या १४,७०८ ऐवजी एकूण १५,७४७ गावांमध्ये दुष्काळसदृष्य परिस्थिती जाहीर केली आहे. त्यास अनुसरुन या विभागाच्या दिनांक ७ डिसेंबर, २०१५ च्या पुरकपत्रान्वये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत संचालक, उच्च शिक्षण यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

पुणे शहर आणि जिल्ह्यात सुमारे ४५ टक्के शाळांमध्ये शालेय परिवहन समिती नसल्याबाबत

(६) ११२५५ (०९-०४-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळेत जाणा-या विद्यार्थ्यांना शाळेत घेऊन जाणा-या स्कुलबसच्या वाढत्या दुर्घटनांमुळे शासनाने माहे मार्च, २०११ मध्ये सुरक्षिततेसाठी शालेय वाहतूक नियमावली अंमलात आणून सर्वच शाळा, स्कुलबस मालक आणि शिक्षण खात्याचे अधिकारी यांचा शालेय

परिवहन समिती, शाळा मास्तर वा मुख्याध्यापकांच्या अध्यक्षतेखाली नेमण्याच्या स्पष्ट सूचना सर्व शाळांना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक वर्ष संपत आले तरी पुणे शहर आणि जिल्हयात सुमारे ४५ टक्के शाळांमध्ये शालेय परिवहन समिती नसल्याचे तसेच पोलीस आयुक्त, महापालिका आयुक्त व आरटीओतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेली पुणे जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समितीची बैठक सहा महिन्यात घेतली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित शालेय परिवहन समिती स्थापन न करणा-या संबंधित शाळा चालकांवर व मुख्याध्यापकांवर आतापर्यंत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, असल्यास, कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (20-०२-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

प्रस्तुत प्रकरणी पुणे जिल्हयातील मुख्याध्यापकांची दि. १९,२१,२५ व २६ ऑगस्ट रोजी बैठकी घेऊन प्रत्येक शाळेमध्ये परिवहन समितीची स्थापना व नियमित बैठका घेण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

रिसोड (जि.वाशिम) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या बंद असलेल्या शाळा खोल्यांचा गैरवापर होत असल्याबाबत.

(७) १३५९२ (०८-०४-२०१५). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिसोड (जि.वाशिम) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या बंद असलेल्या शाळा खोल्यांचा गैरवापर होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंद खोली सुरू करून त्या जागी वर्ग घेण्यात यावे अशी मागणी दिनांक ५ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी वर्ग सुरू करण्यासाठी प्रशासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०३-०३-२०१६) :(१) होय.

(२) होय.

(३) व (४) सदर शाळा इमारतीची मागील बाजूची भिंत पडली असल्याने तेथे वर्ग सुरु करण्यात आले नाहीत. नवीन इमारतीत वर्ग भरविण्यात येत आहेत.

राज्यातील १४ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात ३०० पेक्षा जास्त वैद्यकीय शिक्षक कंत्राटी पध्दतीवर कार्यरत असल्याबाबत

(८) १९२५४ (३१-०७-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १४ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात ३०० पेक्षा जास्त वैद्यकीय शिक्षक कंत्राटी पध्दतीवर कार्यरत असून त्यांना शासनाच्या कोणत्याही सवलतीचा लाभ मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००७ मध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात कार्यरत अधिव्याख्यातांना स्थायी करण्याचा निर्णय वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाने घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील कंत्राटी वैद्यकीय व्याख्यात्यांना कायम करण्याबाबत शासनस्तरावर पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०९-०२-२०१६) :(१) शासकीय वैद्यकिय महाविद्यालयामध्ये प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांची शासन निर्णय दिनांक ०७/०९/२०११ मधील तरतुदीनुसार कंत्राटी तत्वावर ३६० दिवसांसाठी संबंधित अधिष्ठाता यांच्या स्तरावरुन नियुक्ती केली जाते.

तसेच अधिव्याख्याता (सहायक प्राध्यापक) यांची नियुक्ती कंत्राटी पध्दतीने केली जात नाही.

कंत्राटी वैद्यकिय शिक्षकांना कोणतेही भत्ते अनुज्ञेय नाहीत. मात्र त्यांना किरकोळ रजा अनुज्ञेय आहे.

(२) सन २००९ मध्ये तात्पुरत्या स्वरुपात कार्यरत असलेल्या अधिव्याख्यातांना नियमित करण्यात आलेले आहे.

(३) कंत्राटी वैद्यकिय व्याख्यातांना नियमित करण्याचीबाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

तारळ व वाडापाल्ये (ता.राजापूर,जि.रत्नागिरी) खारभूमी योजनेला सीआरझेड मधुन सूट मिळणेबाबत

(९) १९६०४ (३१-०७-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारळ व वाडापाल्ये (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) खारभूमी योजनेला सीआरझेड मधुन सूट मिळणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजी व त्यानंतरही

अनेकवेळा मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना पत्रव्यवहार करुन अद्यापी कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंब लागण्याची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (१०-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२) व (३) तालुका राजापूर येथील तारळ व वाडापाल्ये या खारभूमी योजनांना सीआरझेड अधिसूचना १९९१ मधून सूट मिळणेबाबतचा प्रस्ताव खारभूमी विकास मंडळ, ठाणे यांचेकडून प्राप्त झाला होता. सदर प्रस्ताव महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण अर्थात एम.सी.झेड एम.ए. च्या दिनांक २४ व २५ नाव्हेंबर, २०१४ रोजी संपन्न झालेल्या ९४ व्या बैठकीमध्ये चर्चेसाठी ठेवण्यात आला होता. सीआरझेड अधिसूचना २०११ नुसार उपरोक्त नमुद नवीन खारभूमी योजनांसाठी जलद पर्यावरणीय आघात मुल्यांकन अहवाल सादर करणे आवश्यक आहे असा निर्णय सदर बैठकीमध्ये घेण्यांत आला. सदर निर्णयानुसार जलद पर्यावरणीय आघात मुल्यांकन अहवाल सादर करणेबाबत अधीक्षक अभियंता, खारभुमी विकास मंडळ, ठाणे यांना कळविण्यांत आले आहे. सदर अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीमध्ये असणा-या डोंबिवली एमआयडीसी मधील प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्याबाबत

(१०) १९९१८ (१०-०८-२०१५). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीमध्ये असणा-या डोंबिवली एमआयडीसी मधील प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी सामुहिक सांडपाण्यातून घनपदार्थ वेगळे करणारे संयंत्र कार्यान्वित करण्यात आले आहे तसेच बायोमास टॉवर दिनांक ३० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास उभारण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सामुहिक सांडपाण्यातून घनपदार्थ वेगळे करणारे संयंत्र व बायोमास टॉवर कार्यान्वित करण्यात आले आहे, हे ही खरे आह काय,

(३) असल्यास, एमआयडीसीमध्ये मोठया प्रमाणावर प्रदुषण होण्याची कारणे काय आहेत व त्यावर कोणकोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२१-०३-२०१६) :(१) व (२) होय.

(३) डोंबिवली औद्योगिक वसाहतीमध्ये औद्योगिक विभाग व रहिवासी विभाग एकत्र असून रहिवासी विभागाकडून अनधिकृतरित्या नागरी घनकच-यांची व घरगुती सांडपाण्याची विल्हेवाट केली जाते.

औद्योगिक कारखान्यांनी प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविलेली असून ती सतत कार्यान्वित असते. प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून कारखान्यांना वेळोवेळी भेटी देवून त्यांची पहाणी केली

जाते. डोंबिवलीतील प्रदूषणाला नविन इमारतींचे बांधकाम, रस्त्यांचे बांधकाम, वाहनांपासून होणारे प्रदूषण इ.घटक ही कारणीभूत आहेत.

सामुहिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेत कार्यान्वित असलेल्या प्रक्रिया यंत्रणा अद्यावत करण्याबाबत डीपीआर बनविण्याचे काम चालू आहे. डीपीआर मधील माहिती व त्यामधील प्रस्तावित उपाययोजना यांच्या आधारे औद्योगिक प्रदूषण आणखी नियंत्रित करणे शक्य होणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बुलढाणा जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा शिक्षण हक्क कायद्यातील अंतराच्या निकषामुळे अपात्र ठरविण्यात आल्याबाबत

(११) २११०४ (१०-०८-२०१५). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायद्यानुसार इयत्ता १ ते ५ कनिष्ठ प्राथमिक स्तर व इयत्ता ६ ते ८ वरील प्राथमिक स्तर असे प्राथमिक शिक्षणाचे स्तर निश्चित करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही बुलढाणा जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ६१८ शाळांना इयत्ता ५ वी ची व ४१६ शाळांना इयत्ता ८ वी ची सुविधा उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अंतराच्या निकषांमुळे सदर शाळा अपात्र ठरविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील निकषात दुरुस्ती करुन उक्त शाळांना ५ वी व ८ वी चे वर्ग सुरु करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०४-०२-२०१६) :(१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ अन्वये १ कि.मी. परिसरात इ. ५ वी ची तसेच ३ कि.मी. परिसरात इ. ८ वी ची शाळा उपलब्ध करणे आवश्यक असल्याने त्यानुसार कार्यवाही करणे क्रमप्राप्त आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर वाढीव पाणीपुरवठा योजना व विस्तारीत पाणीपुरवठा योजनांच्या कामाबाबत

(१२) २२१५९ (२९-०७-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर वाढीव पाणीपुरवठा योजना व चंद्रपूर विस्तारीत पाणीपुरवठा योजना या दोन्ही योजना पूर्ण करण्यात आले असल्याने मा.पाणीपुरवठा मंत्री यांनी दिनांक ९ जानेवारी, २०१५

च्या कपासू २०१४/३८/प्र.क्र.२६६/पापु-२२ अन्वये स्थानिक लोकप्रतिनिधी चंद्रपूर यांना लेखी उत्तराद्वारे कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर वाढीव पाणी पुरवठा योजनेकरीता रुपये ४५५.९९ लक्ष किंमतीचे पाईप पैकी तब्बल ३५१.७५ लक्ष किंमतीचे पाईप्स इतर योजनेवर वापरण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सन २०१३-१४ या वर्षात चंद्रपूर शहरातील वितरण व्यवस्था नसलेल्या भागांमध्ये पंचशताब्दी वर्षानिमित्त रु.८४४.७३ लक्ष सुवर्णमहोत्सवी नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा योजनेअंतर्गत रु.३२२.७४ लक्ष, व महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत रु.१६.७२ लक्ष प्राप्त झाला असून या निधी अंतर्गत कोण कोणती कामे करण्यात आली आहेत,

(४) असल्यास, चंद्रपूर महानगरपालिका क्षेत्रातील संपूर्ण वस्त्यांमध्ये नळाद्वारे पाणी वितरण करण्यात येत आहे काय तसेच उक्त क्षेत्रातील कोण कोणत्या वस्त्यांमध्ये नळाद्वारे पाणी वितरण होत नाही व सदर वस्त्यांमध्ये नळाद्वारे पाणी वितरण करण्यासंदर्भात कोणती योजना आखण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (१४-०३-२०१६) :(१) अंशतः खरे आहे. चंद्रपूर वाढीव पाणी पुरवठा व चंद्रपूर विस्तारीत पाणी पुरवठा योजना या दोन्ही योजनांच्या पूर्ण करण्यात आलेल्या उपांगांचा उपयोग करुन चंद्रपूर शहराला महानगरपालिकेतर्फे पाणी पुरवठा सुरळीत सुरु असे दिनांक ९ फेब्रुवारी, २०१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(२) होय.

(३) चंद्रपूर शहरात वितरण व्यवस्था नसलेल्या भागांसाठी ११ विविध भागामध्ये पाईप लाईन टाकण्याचे काम सुरु आहे. नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेच्या रु. ७५५.१५ लक्ष इतक्या खर्चाच्या योजनेस मंजूरी देण्यात आली असून त्यापेकी रु.३३९.८१ लक्ष इतका निधी चंद्रपूर मनपास वितरीत केला आहे. आणि त्यामधून वितरण व्यवस्थेची कामे प्रस्तावित असून कामास सुरुवात झालेली नाही. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत चंद्रपूर शहराच्या पाणीपुरवठा योजनेतील रु. १६३.७२ लक्ष किंमतीच्या सुधारणा कामांस मंजूरी देण्यात आली असून सदर योजनेसाठी अनुज्ञेय असलेल्या अनुदानापैकी रु. ६०.२२ लक्षचा निधी वितरीत करण्यात आलेला आहे. यामधून ग्राहक सर्वेक्षण, पाणीविषयक लेखा परिक्षण ग्राहक सर्वेक्षण, पाणीविषयक लेखा परिक्षण, उर्जा लेखापरिक्षण, हायड्रॉलिक मॉडेलिंग, जी.आय.एस. मॅपींग इ. कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) व (५) चंद्रपूर शहरातील बाबूपेठ परिसरातील बाहेरील भाग तुकुम, इंदिरानगर, एम.ई.एल. वडगांव, भिवापूर, नगिना बाग इ. नवीन विकसित भाग वगळता इतर भागामध्ये नळाव्दारे पाणी वितरीत करण्यात येते. नविन विकसित वस्त्यांमध्ये नळाव्दारे पाणी वितरीत करण्यासाठी महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत पाणी पुरवठा योजनेमध्ये करावयाच्या सुधारणा संदर्भात सर्वेक्षणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. सध्याची अस्तित्वात असलेली पाणी पुरवठा यंत्रणा अपुरी असल्यामुळे पाण्याचे वितरण वाहिनीचे काम हाती घेता आहे नाही. केंद्र

शासन पुरस्कृत अमृत योजनेमध्ये चंद्रपूर महानगरपालिकेकरीता वाढीव व विस्तारीत पाणी पुरवठा योजना मंजूर झालेली असून सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, चंद्रपूर यांचेमार्फत राबविण्यात येणार आहे.

चंद्रपूर येथील चांदा शिक्षण प्रसारक मंडळाच्या संचालकाने कॉलेजमध्ये जेईई आणि वैद्यकिय पूर्व परिक्षेचे क्लासेस सुरु केल्याबाबत

(१३) २३०३७ (३०-०७-२०१५). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाविद्यालयात कोचिंग क्लासेस सुरु करण्यास मनाई असताना चंद्रपूर येथील चांदा शिक्षण प्रसारक मंडळांच्या संचालकाने कॉलेजमध्ये जेईई आणि वैद्यकिय पूर्व परिक्षेचे क्लासेस सुरु केल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर येथे गत अनेक वर्षापासून उक्त संस्थेची बरीच डीएड, बीएड आणि विविध अभ्यासक्रमांची महाविद्यालये चालत असुन या संस्थेअंतर्गत (जनता करिअर लॉचर) या नावाने कोचिंग क्लासेस सुरु असुन महाविद्यालयातील मुलांनाही त्यात प्रवेश घेण्याची सक्ती केली जात असल्यामुळे या नियमाबाहय क्लासेसमुळे विद्यार्थ्यांचे तसेच पालकांचेही नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित दोषींवर पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१७-०२-२०१६) :(१) जेईई आणि वैद्यकीय पुर्व परिक्षेचे जनता करिअर लॉंचर क्लासेस हे जनता महाविद्यालयात घेतले जात नसून, ते चांदा शिक्षण प्रसारक मंडळ, चंद्रपूर या संस्थेच्या मालकीच्या इमारतीमध्ये चालविण्यात येतात.

(२) व (३) सदर क्लासमध्ये प्रवेश घेण्यास विद्यार्थ्यांना तसेच पालकांना कुठलीही तक्रार दाखल नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुण्यातील शाळांनी गणवेश खेरदीबाबत थेट आपापल्या शाळांच्या संकेतस्थळांवरच दुकानदारांची नावे जाहीर केल्याबाबत

(१४) २४१०२ (०६-०८-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील शाळांनी गणवेश खेरदीबाबत आता थेट आपापल्या शाळांच्या संकेतस्थळांवरच दुकानदारांची नावे जाहीर करायला सुरुवात केली असून दुकानदाराचे नाव, पत्ता, फोन नंबर,

दुकानाच्या वेळांसहित सर्व माहिती उपलब्ध करुन दिली जात असल्याची बाब माहे मे, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गणवेश खरेदीबाबत असलेल्या शासन निर्णयाची उक्त शाळांकडून अंमलबजावणी करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२२-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या शालेय पोषण आहाराचे धान्य खाजगी गोडाऊनमध्ये रिकामे करताना रेशनिंग विभागाच्या भरारी पथकाने पकडल्याबाबत

(१५) २८२१९ (१५-१०-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सदा सरवणकर (माहिम) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या शालेय पोषण आहारासाठी फुड कार्पोरेशन ऑफ इंडियाच्या बोरीवली येथील गोदामातून धान्य घेऊन निघालेले दोन ट्रक भिवंडी येथील दिवा परिसरातील हायवेवरील इंडियन ऑईल पेट्रोल पंपाजवळील खाजगी गोडाऊनमध्ये रिकामे करताना ठाणे व मुंबई येथील रेशनिंग विभागातील भरारी पथकाने पकडल्याचे दिनांक ३ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा पकडण्यात आलेला माल कोणता व किती किंमतीचा होता,

(३) असल्यास, स्वस्त धान्य दुकानातून गरीबांना देण्यात येणाऱ्या धान्याचा काळाबाजार करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, राज्यात वारंवार होणाऱ्या अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कडक उपाययोजना वा धोरण ठरविले आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (२०-०२-२०१६) : (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेंतर्गत आहार शिजवून देण्याकरिता भारतीय अन्न महामंडळ, बारीवली येथील गोदामातून उचल केलेला २१० गोणी तांदूळ असलेला ट्रक दि.०१/०८/२०१५ रोजी भिवंडी येथे अन्न व नागरी पुरवठा विभागाने पकडला. सदर ट्रक मण्से २१० गोणी तांदूळ होता. शासन दर रु.५.६५ प्रती किलो याप्रमाणे एकूण १०५०० किलो तांदूळाची किंमत रु.५९,३२५/- इतकी होते.

(३) व (४) सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत वितरीत करण्यात येणाऱ्या अन्नधान्याच्या वितरणात कोणत्याही प्रकारच्या गैरव्यवहाराशिवाय शिधापत्रिका धारकांना नियमितपणे उपलब्ध व्हावे, याकरिता राज्यातील प्रत्येक रास्तभाव/अधिकृत शिधावाटप दुकानाचे वर्षातून किमान दोनदा व सहा महिन्यातून किमान एकदा नियमित तपासणी करण्याबाबत परिपत्रकान्वये

संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत. सदर तपासणीच्या अनुषंगाने रास्तभाव/अधिकृत शिधावाटप दुकानात अनियमितता/ भ्रष्टाचार आढळून आल्यास संबंधित दुकानावर जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत तरतूदीनुसार कार्यवाही केली जाते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील वस्तीशाळा शिक्षकांना पेन्शन योजनेचा लाभ मिळण्याबाबत

(१६) २८२२५ (३१-१०-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.कालीदास कोळंबकर (वळाडा), श्री.अमीन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.पतंगराव कदम (पलुस-कडेगाव), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.बसवराज पाटील (औसा): सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वस्तीशाळा योजना सुरु करतांना आदिवासी पाडे व तांडयावर ८ हजार वस्तीशाळा शिक्षक, आदिवासी भागात स्वयंसेवी शिक्षक म्हणून काम करीत होते, त्यांची सेवा लक्षात घेऊन दिनांक १ मार्च २०१४ रोजी शासनाने सर्व शिक्षकांना पद उपलब्धतेनुसार नियमित शिक्षक म्हणून सेवेत घेतले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यातील काही शिक्षक वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले, मात्र निवृत्त झाल्यानंतर त्यांना कोणत्याही प्रकारची सेवा निवृत्ती मिळाली नसून या शिक्षकांना सेवानिवृत्तीचे लाभ मिळण्यासाठी मागणी होत आहे, असे दिनांक १० ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील वस्तीशाळा शिक्षकांना पेन्शन योजनेचा लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणते धोरण राबविले आहे वा राबविणार आहे ?

श्री. विनोद तावडे (१६-०२-२०१६) :(१) होय हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) दि. १ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयान्वये वस्तीशाळा निमशिक्षकांना नियमित शिक्षक म्हणून सेवेत सामावून घेतल्यानंतर व नियमित वेतनश्रेणी लागू केल्यानंतर त्यांना राज्य शासनाची परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आली आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात भूजल पातळीत घट झाल्याने पाणी टंचाई निवारण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

(१७) २८३६६ (२०-०१-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात यावर्षी केवळ ७० टक्के पाऊस पडल्यामुळे जिल्ह्यातील ८ तालुक्यांतील भूजल पातळीत घट झाल्याचे भूजल विभागाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भूजल पातळीत घट झाल्याने येत्या उन्हाळी हंगामात पाणी टंचाईची समस्या निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पाणी टंचाई निवारणार्थ शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (०९-०३-२०१६) :(१) रत्नागिरी जिल्ह्यात सरासरी ६७.४०% इतका पाऊस झाला असून जिल्ह्यांत निरीक्षण विहीरीतील पाण्याच्या पातळीमध्ये सरासरी ०.४० मि. इतकी घट आढळून आली आहे.
(२) रत्नागिरी जिल्ह्यात पाण्याच्या पातळीतील घट ही अल्प प्रमाणात असल्याने सन २०१६ च्या उन्हाळयात पाणी टंचाई भासण्याची शक्यता नाही. परंतू जिल्ह्यांत झालेल्या अल्प पावसाचा तसेच जिल्ह्याच्या पूर्व भागातील तीव्र उताराचा प्रदेश, डोंगराळ भाग व पुरेसे पाणी साठवू शकेल अशा जलधारक खडकाचा अभाव यामुळे काही भागात एप्रिल, २०१६ पासून पाणी टंचाई भासण्याची शक्यता नाकारता येत नाही.
(३) जिल्ह्यात मिशन बंधारे २०१५ यशस्वीरित्या राबविण्यात आले असून सदर उपक्रमांतर्गत लोकसहभागातून सुमारे ४४६४ बंधारे विविध ठिकाणी बांधण्यात आलेले आहेत. तसेच दरवर्षी प्रमाणे या वर्षीही पाणी टंचाई कालावधीकरीता संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा मंजूरी देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात ग्राहक मंचाकडे प्रलंबित असलेल्या खटल्यांबाबत

(१८) २८५०१ (२१-१२-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ग्राहक कायदयातंर्गत ग्राहक मंचाकडे सुमारे ३६ हजार खटले प्रंलबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एवढया मोठया प्रमाणात खटले प्रलंबित राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर खटले लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याची फलनिष्पत्ती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट (१७-०३-२०१६) :(१) अंशतः खरे आहे. राज्य ग्राहक कायद्यांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या ग्राहक आयोग व ग्राहक मंचामध्ये डिसेंबर, २०१५ अखेर एकूण ३२५७४ इतकी प्रकरणे प्रलंबित आहेत.

(२) राज्य आयोग व जिल्हा ग्राहक मंच यांचा दर्जा अर्धन्यायिक (Quasi Judicial) स्वरुपाचा आहे. तसेच राज्य आयोग तसेच जिल्हा मंचाचे कामकाज दिवाणी न्यायालय प्रमाणे असून राज्य आयोग व जिल्हा मंचातील प्रकरणांच्या सुनावणीचे कामकाज अंशतः दिवाणी न्यायालयाप्रमाणे चालते. तसेच राज्य आयोग व जिल्हा मंचासमोरील पक्षकारांची तसेच वकिलांची अनुपस्थिती, अपुरा कर्मचारी वर्ग इ. कारणामुळे खटले प्रलंबित आहेत.

(३) व (४) उपरोक्त प्रलंबित प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्याकरीता राज्य आयोग तसेच जिल्हा मंचाकडून लोक अदालतच्या माध्यमातून विशेष प्रयत्न केले जातात. राज्य आयोगामार्फत प्रकरणांची सुनावणी घेण्याचे काम मुंबई, औरंगाबाद व नागपूर येथील प्रस्थापित परिक्रमा खंडपीठांकडून केले जाते. तसेच महिन्यातील काही ठराविक कालावधी करीता अयोगाचे कामकाज पुणे, कोल्हापूर, अमरावती व नाशिक येथूनही करण्यात येते जेणेकरुन संबंधित पक्षकारांना मुंबई येथे किंवा नागपूर येथे यावे लागत नाही. तसेच राज्य आयोगा कडील व जिल्हा मंचांकडील प्रकरणांची सुनावणी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगव्दारे घेण्याचेही प्रस्तावित आहे.

मानखुर्द शिवाजी नगर (मुंबई)येथील एस एम एस या इंव्होक्लीन कंपनीकडून होणारे विषारी वायूचे प्रदूषण रोखण्याबाबतची मागणी

(१९) २८५४२ (२१-१२-२०१५). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ईशान्य मुंबईस्थित मानखुर्द शिवाजी नगर मुंबई उपनगर जिल्हास्थित महानगरपालिका एम/पूर्व नागरी परीक्षेत्रात एस एम एस या इंव्होक्लीन औद्योगिक कंपनीकडून कचरा विशेषतः बायोमेडिकल कचरा जाळल्यामुळे व स्थानिक भागात विषारी वायूचे प्रदूषण रोखण्याबाबतची तक्रार स्थानिक नागरिकांनी लोकप्रतिनिधी तसेच सेवाभावी नागरी संस्था यांच्यावतीने मा. मंत्री (पर्यावरण), राज्यमंत्री (पर्यावरण), प्रधान सचिव (पर्यावरण), आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका (पूर्व-उपनगरे), सहाय्यक आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका (एम/पूर्व प्रभाग) यांच्याकडे माहे सप्टेंबर-२०१५ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित महापालिकेने त्यांच्या विवक्षित कायद्यातील तरतुदीनुसार पर्यावरण तसेच प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडे माहे सप्टेंबर २०१५ अखेर पर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, माहे सप्टेंबर-२०१५ मध्ये या कालावधीत करण्यात आलेल्या सूचनांच्या कार्यवाहीपुर्तीबाबत कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे तसेच सदर कामाची माहे सप्टेंबर-ऑक्टोबर २०१५ पर्यंतची सद्यस्थिती काय आहे व सदरचे काम किती कालावधीत पूर्ण केले जाईल वा कोणता कालबद्ध कार्यक्रम आखण्यात आला वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (०३-०३-२०१६) :(१) होय.
(२) व (३) मे.एस.एम.एस. इंव्होक्लीन प्रायव्हेट लि.या कंपनीस दि. ०५.०३.२०१५ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तद्ननंतर वैयक्तिक सुनावणी घेऊन हवा प्रदुषण नियंत्रण करण्यासाठी निर्देश दिले आहेत. त्यानुसार सदर कंपनीने हवा प्रदुषण नियंत्रणासाठी वेट स्क्रबर आणि ३० मीटर उंचीचे धुराडे बसविले आहे. तसेच हवा प्रदुषणाचे मोजमाप करण्यासाठी चोवीस तास चालणारी हवा प्रदूषण मोजमाप करणारी यंत्रणा बसविण्याचे काम सुर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर जिल्ह्यात पाणी टंचाईची समस्या सोडविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

(२०) २९०६० (२०-०१-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यात यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कमी पाऊस पडल्याने जिल्ह्यातील बाराही तालुक्यात भूजल पातळीत लक्षणीय घट झाली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सरासरी पावणेतीन फूट पाणी पातळी खालावली असून उन्हाळ्यात तीव्र पाणी टंचाई निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पाणी टंचाईची समस्या सोडवण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्री. बबनराव लोणीकर (०९-०३-२०१६) :(१) होय.
(२) कोल्हापूर जिल्ह्यात एकूण ९९ निरीक्षण विहिरी निश्चित करण्यात आलेल्या आहेत. माहे ऑक्टोबर, २०१५ मधील निरिक्षण विहिरीतील भूजल पातळीचा मागील ५ वर्षातील ऑक्टोबर महिन्यातील सरासरी भूजल पातळीशी तुलनात्मक अभ्यास करण्यात आलेला आहे. त्यानुसार

I) भूजल पातळीमध्ये ० ते १ मी. खोल गेलेल्या एकूण निरीक्षण विहिरींची संख्या ५३ इतकी आहे.

II) भूजल पातळीमध्ये १ ते २ मी. खोल गेलेल्या एकूण निरिक्षण विहिरींची संख्या ४६ इतकी आहे.

(३) भूजल पातळीमध्ये १ मी. पेक्षा जास्त आढळून येणारी घट व जिल्ह्यात पडलेल्या पर्जन्यमानातील २०% पेक्षा जास्त तूट यांचे आधारे संभाव्य पिण्याच्या पाण्याचा टंचाई अंदाज व्यक्त करण्यात आलेला आहे. त्यानुसार जिल्ह्यातील काही भागात पिण्याच्या पाणी उपलब्ध व्हावे म्हणून जिल्हा यंत्रणेला लक्ष ठेवावे लागेल.
(४) दर वर्षी जिल्ह्याचा पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू नये म्हणून जिल्हाधिकारी यांचेमार्फत तयार करण्यात आलेल्या टंचाई कृती आराखडयामधील उपाययोजना जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येतात. टंचाई कार्यक्रमांतर्गत विविध उपाययोजनेपैकी नविन विंधन विहिरीचे

सर्वेक्षण जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येते.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी माहे जानेवारी ते मार्च २०१६ तसेच माहे एप्रिल-२०१६ ते जून २०१६ अखरे टप्पानिहाय पाणी टंचाई निवारण कृती आराखडा तयार केलेला आहे.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने बीएसडब्ल्यू इंग्रजी विषयाचा अभ्यासक्रम तयार केला नसल्याबाबत

(२१) २९३७५ (२२-१२-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने तृतीय वर्ष बीएसडब्ल्यू या वर्गाच्या इंग्रजी विषयाचा अभ्यासक्रम या वर्षी तयारच केला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठाच्या चुकीमुळे २५० विद्यार्थ्यांचे भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विद्यापिठावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०३-२०१६) :(१) हे खरे आहे. तत्कालीन अधिष्ठाता मानसनिती व समाज विज्ञान विद्याशाखा यांचेकडील दि. १४/०८/२०१५ च्या पत्रान्वये तृतीय वर्ष बी.एस.डब्यू. वर्गाच्या इंग्रजी विषयाचा अभ्यासक्रम तयार करण्यासाठी सूचित करण्यात आले होते. दरम्यान सदर अभ्यासक्रम तयार करण्यासाठी उपसमिती गठित करण्यात आली होती. परंतु सदर समितीचे तत्कालिन अध्यक्ष यांच्या पत्रानुसार तांत्रिक अडचणीमुळे अभ्याक्रम तयार करण्यात आलेला नव्हता व ऑगस्ट, २०१५ नंतर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात कोणतेही प्राधिकरण अस्तित्वात नव्हेते.

(२) विद्यापीठाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेता मागील अभ्यासक्रमानुसार कार्यवाही केलेली आहे. त्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झालेले नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) परिसरातील वैध मापन शास्त्र खात्याचे अधिकृत दलालाने दुरुस्ती आणि मुद्राकंनासाठी जमा केलेल्या वजन मापांची शासकीय फी कोषागारात जमा केली नसल्याबाबत

(२२) ३००८१ (२१-१२-२०१५). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) डोंबिवली परिसरातील वैध मापन शास्त्र खात्याचे अधिकृत दलालाने व्यापारी दुकानदाराकडून दुरुस्ती आणि मुद्राकंनासाठी जमा केलेल्या वजन मापांची शासकीय

फी शासनाच्या कोषागारात जमा केली नसल्याचे माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबधित दलालावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट (०५-०२-२०१६) :(१) व (२) महाराष्ट्र राज्य वजने मापे परवानाधारक संघटना यानी अँटी करप्शन ब्युरो, ठाणे यांच्याकडे दिनांक ०७.०२.२०१४ रोजी शासकीय महसुलाचा अपहार झाल्याबाबत तक्रार केली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने अँटी करप्शन ब्युरोने चौकशी केली असता दुरुस्तक श्री. विठ्ठल अन्नाप्पा जाधव, मे. विनय स्केल सर्व्हिस,कल्याण यांनी रु. ३,३५०/- एवढया शासकीय रकमेचा अपहार केल्याचे आढळून आल्याने त्यांच्याविरुध्द दिनांक १४.०८.२०१५ रोजी मानपाडा पोलीस स्टेशन, डोंबिवली येथे भा.द.वि. संहिता कलम ४०६, ४२० व २०१ प्रमाणे गुन्हा क्र. ४४४/२०१५ नोंदविला आहे. तसेच मे. विनय स्केल सर्व्हिस यांच्या नावे असलेला दुरुस्ती परवाना उप नियंत्रक, वैध मापन शास्त्र, कोकण विभाग यांच्या दिनांक १४.०८.२०१५ च्या आदेशान्वये रद्द करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

डोंबिवली (जि.ठाणे) येथील एमआयडीसी लगत असलेल्या चार्जिंगच्या बॅटरीसाठी लागणारे ग्रीड बनविण्याऱ्या उद्योगांमुळे होणारे प्रदूषण

(२३) ३००८९ (२१-१२-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथील एमआयडीसी लगत असलेल्या उसरघर, संदप, बदलापूर पाईप लाईन या परिसरात चार्जिंगच्या बॅटरीसाठी लागणारे ग्रीड कोळशावर चालणा-या भट्टीवर बनविले जात असून त्यामुळे मोठ्या प्रमाणात आजूबाजूच्या परिसरात धूर निर्माण होत असल्याने नागरिकांना या प्रदूषणाचा त्रास होत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रदूषण मंडळाच्या अधिकारी या ग्रामीण भागात आठवड्यापूर्वी धाड टाकून संबंधित उद्योजकांवर परवाना मागितला असता त्यांच्याकडे कोणतीही आवश्यक कागदपत्रे नसल्याचे उघड झाले परंतू या धाडीच्या वेळी पोलीस संरक्षण नसल्याने सदरहू उद्योजकांनी अधिका-यांवर हल्ला करत त्यांनी बनविलेला अहवाल फाडून टाकला हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित उद्योगांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (०३-०३-२०१६) :(१) व (२) होय.
(३) संबंधित उद्योगांवर कारवाई करण्यासंदर्भात मा.जिल्हाधिकारी ठाणे यांनी कळविण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांना संरक्षण पुरविण्याबाबत पोलीस आयुक्त, कल्याण यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

पिंपळगांव गाढे (ता.परळी,जि.बीड) येथे महाप्रसाद खाल्ल्यामुळे भाविकांना झालेली विषबाधा

(२४) ३०२५५ (२१-१२-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपळगांव गाढे (ता.परळी,जि.बीड) येथे संत पाचले गावकर महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास आयोजित केलेल्या कार्यक्रमामध्ये महाप्रसाद खाल्ल्यामुळे २ हजार भाविकांना विषबाधा झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे,
(३) असल्यास, त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट (१८-०३-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.
(२) अन्न व औषध प्रशासनाच्या बीड कार्यालयाने याबाबत चौकशी केली असून त्यानुसार साबुदाणाचे दोन, रिफाईड पामोलिन तेल व शेंगदाणेचे प्रत्येकी एक असे एकूण चार नमुने तपासणीसाठी घेण्यात आले असून, सदर सर्व नमुने प्रमाणित घोषित झाले आहेत.

तसेच घटनास्थळावरुन साबुदाणा खिचडीचे दोन, मिरची पावडर, सैंधा नमक व शेंगदाणेचे प्रत्येकी एक असे एकूण ०५ अनौपचारीक नमुने घेण्यात आले. सदर नमुन्यांमध्ये अन्न विषबाधेस कारणीभूत असलेले घटक आढळून आलेले नाहीत.

उपरोक्त नमुन्यांपैकी शेंगदाणा हा नमुना कमी दर्जाचा जाहिर झाला असून सदर नमुन्याबाबत पदावधित अधिकारी अन्न व औषध प्रशासन, बीड संबंधित दुकानदाराकडून रु.५०००/-इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.

सदर प्रकरणी वैद्यकीय अधिकारी यांनी सदरची अन्न विषबाधा ही Staphiococcal Food Poisoning या जीवाणूमुळे घडल्याचा अहवाल दिलेला आहे. पोलिस स्टेशन शिरसाळा यांनी कोणत्याही व्यक्तींवर गुन्हा दाखल केलेला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ग्रामीण भागातील जनतेला चांगल्या आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणेबाबत

(२५) ३०२५९ (२२-१२-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील जनतेला चांगल्या आरोग्य सेवा मिळाव्यात यासाठी राज्यातील ज्या जिल्हयात वैद्यकीय महाविद्यालय नाहीत त्या जिल्हयांमध्ये पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीपच्या माध्यमातून वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने निर्णय घेऊन ज्या जिल्हयात वैद्यकीय महाविद्यालये नाहीत तेथे पीपीपी च्या माध्यमातून वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१७-०२-२०१६) :(१) व (२) पीपीपी तत्वावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्याबाबत अद्याप अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

दुष्काळावर मात करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

(२६) ३१९९८ (२२-०१-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुष्काळावर मात करण्यासाठी आणि टंचाई परिस्थिती रोखण्यासाठी दीर्घकालिन उपाय सुचविणाऱ्या महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) कायद्याची अंमलबजावणी दोन वर्षे उलटली तरी अद्याप करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कायद्यात जमिनीखालील पाण्याचे नियोजन व व्यवस्थापन, पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताचे संरक्षण, भूजलाच्या उपलब्धेनुसार पीक आराखडा आखणे आणि पाण्याचा अतिउपसा थांबविणे अशा तरतूदी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कायदयाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (०९-०५-२०१६) :(१) नाही.

(२) होय.

(३) १. महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन अधिनियम २००९ दि. २४ मे, २०१४ नुसार दि.१ जून, २०१४ च्या राजपत्रान्वये राज्यात लागु झालेला असून त्यामधील कलम ३ (१) च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणावर (MWRRA) राज्य भूजल प्राधिकरणाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

२. महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ मधील कलम १७ अन्वये जिल्हा प्राधिकारी म्हणून महसूल विभागाच्या सर्व उपविभागीय अधिकारी (प्रांताधिकारी) यांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे.

३. महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम २००९ अंतर्गतच्या कलम ८ (१) नुसार राज्य भूजल प्राधिकरण (MWRRA) यांनी प्रथमतः राज्यातील अतिशोषित व शोषित अशा ८० पाणलोट क्षेत्रामधील समाविष्ठ गावांमध्ये, कृषी व औद्योगिक वापरासाठी ६० मी.पेक्षा जास्त खोलीच्या विंधण विहिरी/कूपनलीका खोदण्यास पुढील आदेश होईपर्यंत प्रतिबंध केला आहे.

४. महाराष्ट्र भूजल (विकास व व्यवस्थापन) अधिनियम, २००९ मधील प्रयोजने पार पाडण्या करीता भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेव्दारा तयार करण्यात आलेल्या नियमांचा मसुदा अंतिम करणेकरीता सर्व संलग्न मंत्रालयीन विभागांचे प्रतिनिधीत्व असलेली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

प्रियाली बिल्डर्स यांनी सायन कोळीवाडा येथील एसआरए प्रकल्पाच्या बांधकामाकरिता पर्यावरण मंजूरी न घेता केलेल्या बांधकामाबाबत

(२७) ३२०७७ (२१-१२-२०१५). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रियाली बिल्डर्स यांनी सायन कोळीवाडा येथील एसआरए प्रकल्पाच्या बांधकामाकरिता पर्यावरण विभागाची मंजूरी न घेता हेतूतः कमी क्षेत्र दाखवून सदर विभागाची फसवणूक केल्याप्रकरणी तसेच सुनिलकुमार चुग व रविंद्र खोसला यांचे तक्रारीनुसार राष्ट्रीय हरित लवादाने ३ कोटी रुपयांचा दंड ठोठावल्याचे दिनांक ८ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोख दंडाबरोबर विकासकाला अन्य काही बाबींची पुर्तता करण्यास लवादाने सुचविले आहे व सदर अटींची पुर्तता केल्याशिवाय विक्रीच्या इमारतीचे बांधकाम सुरु करता येणार नाही असेही दिलेल्या निकालात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लवादाने दिलेल्या निकालानुसार सदर विकासकाने दिलेल्या मुदतीत कार्यवाही केली नसल्यास सदर विकासकाविरोधात पर्यावरण विभागाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (०३-०३-२०१६) :(१) व (२) होय हे खरे आहे. प्रश्नामध्ये नमूद न्यायालयीन प्रकरणी मा.राष्ट्रीय हरीत प्राधिकरणे, नवी दिल्ली यांच्याकडे दाखल अपील क्र. ६६/२०१४ मध्ये

मा.न्यायालयाने दि.३.९.२०१५ रोजी याबाबतचे आदेश पारित केले आहेत.

(३) व (४) मा. राष्ट्रीय हरित प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या सदर आदेशाविरुध्द मे. प्रियाली बिल्डर्स यांनी मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्याकडे सिव्हील अपील क्र.७१८०/२०१५ दाखल केले असून प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२८.९.२०१५ रोजीच्या अंतरिमआदेशान्वये मा.राष्ट्रीय हरित प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या दि. ३.९.२०१५ रोजीच्या आदेशास स्थगिती दिली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

ब्रह्मपुरी, (जि.चंद्रपूर) येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात तृतीय वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थिनीने आत्महत्या केल्याबाबत

(२८) ३२४९२ (२३-१२-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रह्मपुरी, (जि.चंद्रपूर) येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात तृतीय वर्गात शिकणारी कु.स्वाती सतीश निकुरे या विद्यार्थीनींने दिनांक ४ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास गळफास लावून आत्महत्या केली असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यार्थीनीने महाविद्यालयातील एक प्राध्यापक आणि दोन विद्यार्थ्यांच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली असल्याचे नोंद स्वत:च्या डायरीमध्ये करुन ठेवली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत आढळून आलेल्या दोषीवर शासनाने कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. विनोद तावडे (१८-०२-२०१६) :(१) होय.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांनी त्यांच्या स्तरावर चौकशी समिती गठीत करुन चौकशी केलेली आहे. चौकशी समितीने सदर प्रकरणी पोलीस तपास सुरु असल्याने सदर घटनेसंबंधी अंतिम निष्कर्ष काढणे शक्य नाही.

परंतु श्री.सुहास मधुकर मेश्राम, अधिव्याख्याता, विद्युत अभियांत्रिकी, शासकीय तंत्रनिकेतन, ब्रम्हपुरी यांना सदर घटनेसंबंधी शासनाने दिनांक २२/१२/२०१५ च्या आदेशांन्वये दिनांक १३/१०/२०१५ पासून निलंबीत केलेले आहे.

तसेच याप्रकरणी श्री. सय्यद शाहरुख अली मोनद्दीन अली व श्री. रजत जिभकाटे या तृतीय वर्ष विद्युत अभियांत्रिकी शाखेतील दोन्ही विद्यार्थ्यांना निष्कासित करुन त्यांना नोव्हेंबर/डिसेंबर २०१५ मध्ये महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेमार्फत घेण्यात आलेल्या लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक परीक्षेस बसण्यास मनाई करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे नेसरी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथील नळपाणी पाणीपुरवठा योजनेची प्रलंबित कामे पूर्ण करण्याची मागणी

(२९) ३२५३८ (२१-१२-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नेसरी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथील नळपाणी पाणीपुरवठा योजनेचे प्रलंबित असलेली कामे पूर्ण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (०६-०२-२०१६) :(१) राज्यमंत्री, ग्राम विकास यांनी दि.१४.०८.२०१५ रोजीच्या गडहिंग्लज भेटीत सदर योजनेस मंजुरी द्यावी असे निर्देश दिले आहेत

तथापि, श्रीमती संध्यादेवी कुपेकर, विधानसभा सदस्य यांनी दि.२६.०१.२०१५ रोजीच्या पत्रान्वये सदरची अर्धवट स्थितीत बंद असलेली योजना रद्द करावी व गावाचा विस्तार वाढल्याने पुर्नसर्वेक्षण करुन नवीन नळ पाणीपुरवठा योजना हाती घेण्याची मागणी केली आहे.

(२) सदर योजनेच्या सुधारित अंदाजपत्रकात मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव विभागाकडून जून, २०१४ मध्ये नियोजन व वित्त विभागास सादर करण्यात आला होता, तथापि, मौजे नेसरी ग्रामसभेने दि. २५.०८.२०१४ रोजीच्या ठराव क्र. १२/१ अन्वये सदरची योजना रद्द करुन नवीन नळ पाणीपुरवठा योजना घेण्याची मागणी केली. मागणी केली. त्यानुसार जुनी योजना रद्द करणेची कार्यवाही करणेत येत आहे

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर जिल्हयातील ५ प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे वॉटर ऑडिट व एनर्जी ऑडिट करण्याचा घेतलेला निर्णय

(३०) ३३०४७ (२१-१२-२०१५). श्री.वैभव पिचड (अकोले) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयातील ५ प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे वॉटर ऑडिट व एनर्जी ऑडिट करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने माहे ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (०९-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मालेगांव (जि.नाशिक) येथील गिरणाव धरण उद्भव इस्मालपुरा, हुडको/कॉलनी येथील जलकुंभाचे उर्वरित काम करण्याबाबतची मागणी

(३१) ३३१५३ (२१-१२-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) येथील वाढीव पाणी पुरवठा योजनेतील गिरणाव धरण उद्भव इस्मालपुरा, हुडको/कॉलनी येथील जलकुंभाचे उर्वरित काम महानगर पालिका स्तरावरुन तातडीने पूर्ण करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय यांना दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (०५-०३-२०१६) :(१) नाही.
(२) व (३) मालेगांव (जि.नाशिक) येथील वाढीव पाणी पुरवठा योजनेतील गिरणाव धरण उद्भव इस्मालपुरा, हुडको/कॉलनी येथील जलकुंभाचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत हाताळण्यात येत होते. ठेकेदाराने काम बंद केल्याने निविदा कलम १५ अंतर्गत त्यांचेकडून सदरचे काम काढण्यात आले. उर्वरित काम महानगर पालिका स्तरावरुन करण्याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासोबत PMC करारनामा करण्यात आला आहे. सदर कामाची निविदा प्रपत्रे तयार असून महानगरपालिका स्तरावर ई निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे.

नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयात व विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

(३२) ३३३८३ (२३-१२-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयात व विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थ्यांच्या प्रलंबित मागण्यांचे निवेदन एका विद्यार्थी संघटनेने मा.कुलगुरु यांना दिले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनातील मागण्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०३-२०१६) :(१) होय.
(२) व (३) सप्टेंबर, २०१५ मध्ये विविध संघटनांनी त्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात विद्यापीठाकडे दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनिधीशी चर्चा करुन नियमानुसार मागण्यांची पूर्तता केली आहे. ज्या मागण्या वेळेत पूर्ण करणे शक्य नाही त्या मागण्यांची पूर्तता नंतर करण्यात येईल असे संघटनांना कळविण्यात आलेले आहे.

किकवी (ता.कर्जत, जि.रायगड) येथील वराह पालन व्यवसाय करणाऱ्या फार्म हाऊसमुळे होणारे प्रदूषण

(३३) ३३५२१ (२१-१२-२०१५). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) किकवी (ता.कर्जत, जि.रायगड) येथे गत ४ वर्षापासून वराह पालन व्यवसाय करणाऱ्या फार्म हाऊसमधील डुक्करांचे मलमूत्र आणि विष्ठा नाल्यातून चिल्लार नदीत सोडल्याने त्या दुर्गंधीमुळे नदीचे पाणी दूषित होवू लागल्याने या नदीच्या तीरावर अनेक नळपाणी योजनांचे पाणी दूषित होवून या परिसरातील सहा गावांमधील लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील फार्महाउस तेथून हलवावा अशी मागणी ग्रामस्थांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तसेच जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने फार्म हाऊस व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२४-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

धुळे शहरालगत असलेल्या अनेक गावांना फागणे २१ गाव पाणीपुरवठा योजनेमार्फत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा

(३४) ३३५७५ (२३-१२-२०१५). श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरालगत असलेल्या अनेक गावांना फागणे २१ गाव पाणीपुरवठा योजनेमार्फत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त योजना गेल्या तीन वर्षापासून वीज बिल थकित असल्यामुळे पुर्णपूणे बंद आहे हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे २१ गावातील ५० ते५५ हजार नागरीकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यांदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर धुळे शहरालगत फागणे २१ गावाचा पाणी योजनेचे वीज बिल माफ करण्यासंदर्भात दिनांक ४ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास रोजी मा.ऊर्जामंत्री यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने फागणे २१ गावाचा पाणीपुरवठा योजनेचे विज बिल माफ करुन तातडीने पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (११-०३-२०१६) :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय सदर प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना सन २०१३ पासून बंद अवस्थेत आहे.

(३) होय.

(४), (५) व (६) निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही. तथापि, सदर योजनेतील गावांना सन २०१२-१३ या वर्षात स्वतंत्र पुरक नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत. तसेच समाविष्ट गावांपैकी आवश्यक असलेल्या गावांना पाणी टंचाई निवारणार्थ इतर टंचाईच्या उपाययोजना प्रस्तावित करुन हाताळण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील भुजल सर्वेक्षणाच्या अहवालानुसार मराठवाडा व विदर्भातील गावातील भूजलपातळी वाढविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

(३५) ३३७४१ (२०-०१-२०१६). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील भुजल सर्वेक्षणाच्या अहवालानुसार मराठवाडा व विदर्भातील गावातील भूजलपातळी १ ते ३ मिटर घटली असल्याने बागायती शेतकऱ्यांना व गावातील पिण्याच्या पाण्यासाठी नागरीकांना अडचणी निर्माण होत आहे, असे वृत्त दिनांक १४ मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान प्रसिध्द झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच, भुजल पातळी वाढविण्यासाठी शासन कोणती नवीन उपाययोजना करणार आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (०९-०३-२०१६) :(१) मराठवाडा व विदर्भातील गावातील भूजल पातळी घटण्याचा परिणाम बागायती शेतक-यांना व पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना अडचणी निर्माण होत असल्याबाबतचे वृत्त दि.१४ मे २०१५ रोजी वा त्या सुमारास प्रसिध्दी झाल्याची माहिती उपलब्ध नाही.

तथापि, यंत्रणेमार्फत भूजल पातळीचा अभ्यास माहे ऑक्टोबर, जानेवारी मार्च व मे महिन्यात करण्यात येतो. माहे मार्च, २०१५ मधील निरीक्षण विहीरीतील भूजल पातळीचा मागील ५ वर्षातील मार्च महिन्यातील सरासरी भूजल पातळीशी तुलनात्मक अभ्यास करण्यात आलेला आहे. त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

(अ) मराठवाडा- (औरंगाबाद विभाग)

(i) भूजल पातळीमध्ये १ ते २ मी. खोल गेलेल्या एकूण निरीक्षण विहीरींची संख्या ३२७ इतकी आहे.

(ii) भूजल पातळीमध्ये २ ते ३ मी. खोल गेलेल्या एकूण निरीक्षण विहीरींची संख्या ७४ इतकी आहे.

(iii) भूजल पातळीमध्ये ३ मी. पेक्षा जास्त खोल गेलेल्या एकूण निरीक्षण विहीरींची संख्या ७३ आहे.

(ब) विदर्भ- (अमरावती व नागपूर विभाग)

(i) भूजल पातळीमध्ये १ ते २ मी. खोल गेलेल्या एकूण निरीक्षण विहीरींची संख्या ५९ इतकी आहे.

(ii) भूजल पातळीमध्ये २ ते ३ मी. खोल गेलेल्या एकूण निरीक्षण विहीरींची संख्या २४ इतकी आहे.

(iii) भूजल पातळीमध्ये ३ मी. पेक्षा जास्त खोल गेलेल्या एकूण निरीक्षण विहीरींची संख्या २ आहे.

(२) टंचाई कालावधीत पिण्याचे पाणी तात्काळ उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हानिहाय टंचाई कृती आराखडा जिल्हाधिकारी यांचेमार्फत तयार करण्यात येतो व त्याची अंमलबजावणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे स्तरावरुन करण्यात येते.

(३) भूजल पातळी वाढविण्यासाठी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमार्फत पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकटीकरण करण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (शाश्वतता) ही योजना राज्यात राबविली जात आहे. जलस्वराज्य टप्पा क्र.२ अंतर्गत जागतिक बँकेच्या सहकार्याने राज्यातील १२ जिल्ह्यामध्ये भूजल व्यवस्थापनाचे ४ उपप्रकल्प राबविण्यात येत आहेत.

तसेच नव्याने शासनामार्फत सुरु करण्यात आलेल्या जलयुक्त शिवार अभियानाद्वारे भूजल पुनर्भरणाचे काम घेण्यात येते.

संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती अंतर्गत असलेल्या महाविद्यालयाकडून माजी विद्यार्थी व बही:शाल विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज स्विकारत नसल्याबाबत

(३६) ३३८६७ (२३-१२-२०१५). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती अंतर्गत असलेल्या महाविद्यालयाकडून माजी विद्यार्थी व बही:शाल विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज विद्यापीठाचे आदेश असुन सुध्दा महाविद्यालये परिक्षा अर्ज स्विकारत नसल्याने, अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठात जावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज स्विकारण्यास महाविद्यालये विद्यार्थ्यांची अडवणुक करते अशा अनेक तक्रारी आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०३-२०१६) :(१) होय. महाविद्यालयाने ज्या विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज स्विकारले नाहीत अशा विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज विद्यापीठात विहीत अधिसूचनांचे अधिन राहून स्विकारले जातात.

(२) याबाबत विद्यापीठाला विद्यार्थ्यांकडून तक्रार प्राप्त झाली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ४५०० पाणीपुरवठा योजना शौचालयांच्या जाचक अटींमुळे प्रलंबित असल्याबाबत

(३७) ३४०६४ (२१-१२-२०१५). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४५०० पाणीपुरवठा योजना शौचालयांच्या जाचक अटींमुळे प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या गावाने अधिकची शौचालये बांधली असतील त्यांना आणि ज्या गावाने अत्यंत कमी शौचालये बांधली असतील अशा दोन्ही प्रकारच्या गावांना दुप्पट शौचालये बांधण्याची अट घातल्यामुळे बहुतांश पाणीपुरवठा योजना रखडल्या असून केंद्राकडून ४५० कोटीचा निधी राज्य शासनाकडे आलेला असतांना देखील मात्र केवळ शौचालयांची अट पूर्ण करु न शकल्यामुळे सदर योजना रखडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अधिकची शौचालये करणाऱ्या गावांना सवलत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (१४-०३-२०१६) :(१) अंशतः खरे आहे.

जिल्ह्यांकडून प्राप्त प्रगती अहवालानुसार माहे जानेवारी, २०१६ अखेर राज्यात प्रगतीपथावर असलेल्या ३०१० गावे/वाड्यांच्या १९९१ पाणी पुरवठा योजनांपैकी २९ गावे/वाड्यांच्या २२ पाणी पुरवठा योजना हागणदारीमुक्तीच्या अटीमुळे प्रलंबित आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

रंकाळा (जि.कोल्हापूर) तलावातील पाणी हरित लवादाच्या सूचनेनुसार चिपळूणच्या प्रयोगशाळेत पाठविल्याबाबत

(३८) ३५२३० (२१-१२-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रंकाळा (जि.कोल्हापूर) तलावातील तीन ठिकाणचे पाणी हरित लवादाच्या सूचनेनुसार प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी चाचणीसाठी चिपळूणच्या प्रयोगशाळेत माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पाण्याच्या चाचणीचा अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालात काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (२४-०२-२०१६) :(१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्यांच्याकडे प्राप्त तक्रारीस अनुसरुन दि.२४.०९.२०१५ रोजी रंकाळ तलाव व बाजुच्या नाल्यातून वाहणाऱ्या पाण्याचे नमूने घेऊन पृ:थकरणासाठी त्याच दिवशी चिपळूण येथे पाठविले.

(२) प्राप्त झालेले पृथ:करण अहवाल दि.१४.१०.२०१५ रोजीच्या पत्रान्वये कोल्हापूर महानगरपालिकेस कळविण्यात आले आहेत.

(३) रंकाळा तलाव प्रदूषित होऊ नये म्हणून मा. राष्ट्रीय हरीत लवाद, पुणे यांनी १८/२०१५ द्वारे दाखल याचिकेत दिलेल्या निर्देशानुसार एम. एस.विद्यापीठ, बडोदा यांना या कामी कार्यादेश दिले असून त्यानुसार कार्यवाहीचा अहवाल मा. हरीत लवाद, पुणे यांच्या मान्यतेने पुढील मंजूरीसाठी कोल्हापूर महानगरपालिका पाठवित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

यशवंतराव चव्हाण मुक्त विदयापीठातून जळगांव केंद्रातून परिक्षा दिलेल्या विदयार्थ्यांना परिक्षेला हजर राहूनही गैरहजेरीचा शेरा मारल्याबाबत

(३९) ३५२६७ (२३-१२-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या जळगांव केंद्रातून परिक्षा दिलेल्या काही विदयार्थ्यांच्या गुणपत्रिकेत परिक्षेला हजर राहूनही गैरहजर असल्याचा शेरा मारण्यात आल्याचे

माहे सप्टेंबर २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदरची चुक दुरुस्त करण्याकरिता नाशिक येथे जाण्याचा सल्ला सदर केंद्रातून देण्यात येत असल्याने या विदयार्थ्यांना वेळ व आर्थिक भुर्दंडही सहन करावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी जबाबदार असणा-या कर्मचारी व अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली तसेच या विदयार्थ्यांचे वर्ष वाया जावू नये म्हणून सदर केंद्रातून ही चूक सुधारुन देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०३-२०१६) :(१) होय.
(२) नाही. विद्यार्थ्यांनी नाशिकला जावे अशा कोणत्याही सूचना अभ्यासकेंद्रांना दिलेल्या नाहीत.

विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाऊ नये म्हणून अशा प्रकरणांच्या चुका दुरुस्त करण्याचे काम युध्द पातळीवर सुरु असून बहुतांश प्रकरणे निकाली काढली आहेत. बाकीची प्रकरणी लवकरच निकाली काढली जातील.
(३) सदरपैकी बहुतांश प्रकरणांमध्ये विद्यार्थ्यांनी परिक्षा अर्ज न भरणे अथवा ती विद्यापीठास प्राप्त न होणे, परस्पर परिक्षा केंद्र बदलणे, विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित नसणे, प्रवेश प्रक्रिया अपूर्ण बसणे अथवा वेळेत केलेली नसणे, नोंदणीकृत विषयाची परिक्षा न देणे अशा त्रुटी असल्याने संबंधित कम्रचारी व अधिकारी यांच्याबाबत कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मिरज (जि.सांगली) येथे बनावट मीठाचा साठा जप्त केल्याबाबत

(४०) ३५२९९ (२१-१२-२०१५). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) : सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरज (जि.सांगली) येथे वेगवेगळया ११ नामांकित कंपन्याच्या नावाने बनावट मिठाचा साठा सापडल्याची घटना माहे जुलै २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीश बापट (०३-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.

तथापि, सदर प्रकरणी मिरज लोहमार्ग पोलिस ठाणे यांनी भा.दं.वि. कायद्याअंतर्गत व कॉपीराईट ॲक्ट अंतर्गत कारवाई केली आहे.

(२) मिरज लोहमार्ग पोलिस ठाणे कार्यक्षेत्रात दि.२३/७/२०११५ रोजी गुजरात हालवाड येथून तामिळनाडू मधील ''सागर शुध्द'' या मिठाच्या प्रोडक्टची नक्कल करुन ''सागर प्लस'' या नावाने विक्रीसाठी पाठविले होते. सदर मिठ बनावट नसल्याने असा मिठाचा साठी जप्त केलेला नाही. परंतु कंपनीचे ब्रँडींग बनावट असल्याने सदर प्रकरणी मिरज लोहमार्ग पोलीस ठाणे, येथे गुन्हा रजि.नं.२४/२५ भा.द.वि. कलम ४१९,४२०,३४ कॉपीराईट ॲक्ट ५२(अ) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणाचा तपास पूर्ण झाला असून, रेल्वे पोलिसांनी मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मिरज यांचे न्यायालयात दोषारोप पत्र सादर केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यातील नाऊर येथे दुषित पाण्याचा पुरवठा होत असल्याबाबत

(४१) ३५६७० (२०-०१-२०१५). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (जि.अहमदनगर) तालुक्यातील नाऊर येथील पिण्याचे पाणी मोठ्या प्रमाणात खराब झाले असून नदीचे पाणी ग्रामपंचायतीच्या विहिरीत गेल्याने पिण्याच्या पाण्यामध्ये जंतू सदृश्य गाळ आणि शेवाळ आढळून येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दूषित पाण्यामुळे ग्रामस्थांचे तसेच बालकांचे आरोग्य धोक्यात आले असून आरोग्य विभागाने व ग्रामपंचायतीने त्वरीत पाणीशुध्दीकरण करण्याची मागणी येथील ग्रामस्थांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (२१-०३-२०१६) :(१) व (२) हे खरे नाही.

(३) माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये नाऊर येथील पाणी नमुना प्रयोगाशाळेत तपासणी साठी पाठविला होता, प्रयोगशाळेच्या अहवालानुसार सदरहू पाणी पिण्यास योग्य आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

महाड (जि.रायगड) तालुक्यात विहिरींच्या खोदाई कामात झालेला गैरव्यवहार

(४२) ३५७१० (२०-०१-२०१६). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) तालुक्यात सन २०१४-१५ मध्ये टंचाई आराखड्यानुसार खोदाई करण्यात आलेल्या ७ गांवे व २६ वाड्यांतील ३६ विहिरीपैंकी काही विहिरींची खोदाईच करण्यात

आली नसल्याचे अलिकडेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (०३-०३-२०१६) :(१) हे अंशतः खरे आहे.

विधंन विहिर ठेकेदाराने ७ गांवे व २६ वाड्यांतील ३६ विहिरीपैकी ५ गावे व २७ वाड्यांमधील एकूण ३२ विंधण विहिरी खोदल्या आहेत.
(२) होय. उप अभियंता (यांत्रिकी) ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांचेकडून चौकशी करण्यात आलेली आहे.
(३) महाड तालुक्यात प्रशासकीय मान्यता दिलेल्या विंधण विहिरींपैकी ४ विंधण विहिरी खोदल्या नसल्याचे आढळून आलेले आहे. त्यानुसार संबंधित ठेकेदार यांना उप अभियंता (यांत्रिकी) ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, रायगड जिल्हा परिष्ज्ञद, अलिबाग यांनी नोटीस दिलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे किन्हवली (ता.शहापूर,जि.ठाणे) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगरामधील दलित वस्तीकरिता मंजूर झालेल्या शौचालयांच्या देयकात केलेला गैरव्यवहार

(४३) ३५९०१ (२०-०१-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे किन्हवली (ता.शहापूर,जि.ठाणे) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगरामधील दलित वस्तीसाठी स्वच्छ भारत अभियानासाठी सन २०१२ मध्ये मंजूर झालेल्या ४९ शौचालयांची देयके माहे सप्टेंबर, २०१५ अखेर देण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर ग्रामपंचायतीच्या कर्मचा-याने प्रति लाभार्थी ७५० रुपये पावती न देता गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार पुढे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (१०-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.

सदर लाभार्थी स्वच्छ भारत मिशन (ग्रा) चे नसून ग्रामीण दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजनेतील आहेत. सदर ४९ खाजगी नळ जोडणीच्या लाभार्थ्यांपैकीच २७ लाभार्थी हे

वैयक्तिक शौचालयाचे आहेत. सदर २७ लाभार्थीपैकी माहे सप्टेंबर, २०१५ पर्यंत ६ लाभार्थ्यांनी वैयक्तिक शौचालय व नळ जोडणीचे काम पूर्ण केल्याने शासन निर्णयानुसार प्रति लाभार्थी रु.१५, ०००/- प्रमाणे अनुदान त्यांचे खाती जमा करण्यात आलेले आहे.

सदर योजनेंतर्गत वैयक्तिक शौचालयांच्या उर्वरित २१ लाभार्थ्यांपैकी १७ लाभार्थ्यांची कामे प्रगतीपथावर असून, ४ लाभार्थींनी अद्याप काम सुरु केलेले नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई विद्यापीठातील एमए, एमएस्सी, एमकॉम इत्यादी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचा कालावधी दोन ऐवजी दीड वर्षावर आणण्याचा प्रस्ताव

(४४) ३६२७१ (२०-०१-२०१६). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातील एमए, एमएस्सी, एमकॉम इत्यादी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांचा कालावधी दोन ऐवजी दीड वर्षावर आणण्याचा प्रस्ताव मुंबई विद्यापीठाने तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्ताव मुंबई विद्यापीठाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०८-०३-२०१५) :(१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर मधील बायोकेमेस्ट्री विभागातील खरेदी दोन यंत्रे बंद असल्याबाबत

(४५) ३६३४५ (२२-१२-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर मधील बायोकेमेस्ट्री विभागाकरीता खरेदी करण्यात आलेले दीड कोटी रुपयाची दोन यंत्रे मागील सात महिन्यांपासुन रिएजंट किटच्या अभावामुळे बंद पडलेले असल्याबाबतची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बायोकेमेस्ट्री विभागाकरीता खेरदी करण्यात आलेले बेकमन कॉल्टर कंपनीचे एनलयाझर यंत्र एका तासात दोन हजाराच्यावर नमुने तपासणी करुन अचुक अहवाल देत

असते, तर दुसरे थायरॉईडची चाचणी करणारे यंत्र सिमेन्स कंपनीचे असून या दोन्ही कंपन्यांच्या यंत्राला एका विशिष्ट कंपनीचीच रिएजंट किट लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही यंत्राच्या दुरुस्तीचा साधारण खर्च सात लक्ष रुपयाचा असून याबाबतचा प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाकडे मंजुरीकरीता पाठविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ही दोन्ही यंत्रे बंद पडली असल्यामुळे जुन्याच यंत्रावर अवलंबुन रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, दोन्ही यंत्राच्या दुरुस्ती करीता ७ लक्ष रुपयाचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे काय,

(६) नसल्यास, निधी उपलब्ध न करुन देण्याची कारणे काय?

श्री. विनोद तावडे (१८-०३-२०१६) :(१) नाही, हे खरे नाही.

(२) होय.

दोन्ही यंत्राकरीता उत्पादक कंपनीचीच किट्स आवश्यक असतात.

(३) नाही.

सदरील दोन्ही यंत्रे रुग्णसेवेत कार्यरत असल्याने दुरुस्तीचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

आरटीई अंतर्गत समाजातील वंचीत दुर्बल घटकांतील विद्यार्थी अद्यापही प्रवेशापासून वंचीत असल्याबाबत

(४६) ३७१०१ (२१-०१-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समाजातील वंचीत व दुर्बल घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टीने आरटीई अंतर्गत नामांकित कॉन्वेंट मध्ये प्रवेश देण्याबाबतची मुदत दिनांक १५ सप्टेंबर पर्यंत असून सुध्दा विद्यार्थी प्रवेशा पासून वंचीत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (१७-०३-२०१६) :(१) अंशत: खरे आहे.

आरटीई २००९ अंतर्गत २५ टक्के प्रवेश प्रक्रिया अल्पसंख्याक प्रमाणपत्र धारक कॉन्वेंट शाळांना लागू नाही. सन २०१५-१६ मध्ये २५ टक्के प्रवेशांतर्गत मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका प्रलंबित असल्याने प्रवेश प्रक्रियेस विलंब झाला आहे.

(२) अल्पसंख्याक शाळा वगळून सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून प्रवेश प्रक्रिया संपूर्ण राज्यात ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

गौरखेड (ता.भातकुली, जि.अमरावती) हा गावाला लागून निंभा व परलाम ही दोन्ही गावे खारपाण पट्ट्यामधून कमी करण्याबाबत

(४७) ३८१४८ (२२-०१-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गौरखेड (ता.भातकुली, जि.अमरावती) हा गावाला लागून निंभा व परलाम ही दोन्ही गावे खारपाण पट्ट्यात नाही परंतु गौरखेडा गाव हे मध्यभागी असून ही खारपाण पट्ट्यात टाकलेले आहे त्यामुळे सिंचनाचा लाभ शेतकऱ्यांना मिळत नसल्याचे गौरखेडा हे गाव खारपाण पट्ट्यामधून कमी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६ जून, २०१५ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खारपाण पट्ट्यातून गोरखेडा (ता.भातकुल) हे गांव कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. बबनराव लोणीकर (१९-०३-२०१६) :(१) होय.

(२) सदर गावे, खारपाण पट्याच्या अभ्यासाकरीता नेमलेल्या उच्चाधिकार समितीने केलेल्या शिफारशीनुसार खारपाण पट्यात सामाविष्ट केलेली आहे सदर गावे खारपाण पट्टयातून कमी करण्याबाबतचा प्रस्ताव क्षेत्रिय स्तरावरुन शासनास प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर येथील महाऔष्णिक विद्युत क्रेंद्रातील संच क्र.२ बंद करण्याच्या नोटीसबाबत

(४८) ३८३९० (२१-१२-२०१५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील महाऔष्णिक विद्युत केंद्रातील २१० मेगावॅट क्षमतेचा संच क्र.२ च्या प्रदुषणाची मात्रा सुमारे ९०० पट वाढल्याने सदर संच बंद करण्याची नोटीस केंद्रीय समितीने बजावली असल्याचे माहे नोव्हेंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रामदास कदम (०३-०३-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

अहमदनगर जिल्हयातील १४ ही तालुक्यातील पाण्याच्या पातळीत १ ते ३ मीटरने घट झाल्याबाबत

(४९) ३९४०३ (२१-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूजल सर्वेक्षण विभागाने केलेल्या निरीक्षणानुसार अहमदनगर जिल्हयातील १४ ही तालुक्यातील पाण्याची पातळी गत वर्षापेक्षा १ ते ३ मिटरने कमी झाल्याचे माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील पाच वर्षाच्या तुलनेत माहे जानेवारी, २०१५ च्या अखेरीस जिल्हयाच्या पाणीपातळीत मोठी घट झाल्याने माहे मार्च, २०१५ मध्ये पुन्हा सर्वेक्षण करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अत्याधुनिक पध्दतीने ठिबक अथवा तुषार सिंचन पध्दतीचा वापर न करता पारंपारिक पध्दतीने शेतीला पाणी देण्यासाठी भूगर्भातील पाण्याचा बेसुमार उपसा केला जात असून शेततळाची संख्या वाढली असून, शेत तळ्यांमध्ये पाणी साठविताना प्लॅस्टिकचा वापर केला जात असल्याने जमिनीत पाणी मुरत नसल्याने भूजल पातळी वेगाने कमी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार भूजल पातळी वाढविण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे ?

श्री. बबनराव लोणीकर (०९-०३-२०१६) :(१) अहमदनगर जिल्हयातील एकूण १९२ निरीक्षण विहीरींच्या भूजल पातळीचा अभ्यास केला असता माहे मार्च, २०१५ मधील पाणी पातळीचा मागील ५ वर्षाच्या माहे मार्च मधील पाणी पातळीशी तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर एकूण ६२ निरीक्षण विहीरीमध्ये १ मी. पेक्षा जास्त पाणील पातळीत घट झाल्याचे आढळून येत आहे.

(२) अहमदनगर जिल्हयामध्ये तसेच राज्यामधील निरीक्षण विहीरींचा माहे ऑक्टोबर, जानेवारी, मार्च व मे महिन्यामध्ये भूजल पातळीचा नियमित अभ्यास केला जातो.

(३) शासनामार्फत विविध योजनेतंर्गत ठिंबक अथवा तुषार सिंचन पध्दतीचा वापर करणेकरीता प्रोत्साहन दिले जाते. सन २०१५-१६ मध्ये प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेतंर्गत केंद्र पुरस्कृत सुक्ष्म सिंचन योजना राबविण्यात येत आहे. भूगर्भात भूजलाचे जास्तीत जास्त पुनर्भरण होणेकरीता राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम (शाश्वतता) व जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुराभिलेख संचालनालयामध्ये स्कॅनिंग आणि मायक्रोफिल्मींगच्या कामामध्ये झालेला गैरव्यवहार

(५०) ३९६०८ (२१-१२-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुराभिलेख संचालनालयामध्ये स्कॅनिंग आणि मायक्रोफिल्मींगच्या कामामध्ये रुपये २ कोटींचा गैरव्यवहार झाल्याची बाब सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत वर्षभराचे स्कॅनिंग व मायक्रोफिल्मींगचे काम रीतसर पडताळणी न करताच, कोणत्याही समितीने तपासणी न करता, कोणतेही प्रमाणपत्र न लावताच पूर्ण कामाची रक्कम ठेकेदारास अदा करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्कॅनिंग आणि मायक्रोफिल्मींगच्या काम करताना दुर्मिळ ऐतिहासिक दस्तऐवज फाटलेले व जीर्ण होत असून त्यावर काहीच उपाययोजना करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी श्री.दिलीप सावंत छायाचित्रकार तथा सहायक संचालक आस्थापना यांच्यासह इतर अधिकारी सहभागी आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदर प्रकरणी चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे (०३-०३-२०१६) :(१), (२), (३) व (४) स्कॅनिंग आणि मायक्रोफिल्मीगच्या कामामध्ये गैरव्यवहार होत असल्याने त्याबाबतची चौकशी करण्याबाबत तक्रार शासनास प्राप्त झाली होती. या अनुषंगाने संचालक, पुराभिलेख संचालनालय यांचकडून प्राप्त अहवालाच्या आधारे प्रस्तुत प्रकरणी अधिक कार्यवाहीची आवश्यकता नसल्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.